# जिल्हा निवड समिती, चंद्रपूर
## तलाठी पदासाठी लेखी परीक्षा (१ सप्टेंबर, २०१३)

१) शेतकऱ्यांचा आसूड या ग्रंथाचे लेखक.
अ) महात्मा ज्योतिबा फुले ब) सावित्रीबाई फुले क) लोकमान्य टिळक ड) न्यायमूर्ती रानडे

२) सव्यापसव्य या शब्दाचा समानार्थी शब्द लिहा.
अ) आजुबाजुला ब) नसती उठाठेव क) हमरीतुमरी ड) अघळपघळ

३) दगडावरची रेघ या वाक्यप्रचाराचा योग्य अर्थ ओळखा.
अ) खरे ठरणारे भविष्य ब) भविष्यातील भाकीत क) खोटे ठरणारे भविष्य ड) यापैकी नाही

४) बादरायण संबंध असणे.
अ) घनिष्ठ मैत्री असणे ब) दुरान्वयाने संबंध असणे
क) ओढूनताणून संबंध लावणे ड) शत्रुत्व असणे

५) 'मी आता व्यायाम करीत आहे' या वाक्यातील काळ ओळखा?
अ) भूतकाळ ब) भविष्यकाळ क) चालू वर्तमानकाळ ड) पूर्ण भूतकाळ

६) भरवशाच्या म्हशीला टोणगा याचा अर्थ.......
अ) सगळेच मुसळ केरात ब) खात्रीच्या व्यक्तीकडून पूर्ण निराशा
क) केलेले सर्व प्रयत्न फुकट जाणे ड) स्वकीयांकडून घात होणे

७) दुसऱ्याच्या मनातले ओळखणारा.
अ) चतुर ब) खोटारडा क) मनकवडा ड) हुशार

८) झाडे या शब्दाचे मूळरूप लक्षात घेतल्यास त्यांचे लिंग कोणते?
अ) पुल्लिंग ब) स्त्रीलिंग क) नपुसकलिंग ड) उभयलिंग

९) वसुंधरा, मही, अवनी, धरित्री हि ......... यांची नावे आहेत.
अ) मुलींची नावे ब) स्त्रियांची नावे क) पृथ्वीची संबोधने ड) मुलांची नावे

१०) ....... प्रयोगात कर्त्याप्रमाणे क्रियापद चालते.
अ) कर्मणी ब) भावे क) केवल ड) कर्तरी

११) राम गणेश गडकरी यांनी कोणत्या टोपण नावाने कविता लिहिल्या आहेत?
अ) केशवकुमार ब) यशवंत क) मोरोपंत ड) गोविंदाग्रज

१२) नाटकाच्या प्रारंभीचे स्तवन गीत यासाठी पर्याय निवडा.
अ) अभंग ब) नांदी क) स्वगत ड) भरतवाक्य

१३) 'अनुज' या मराठी शब्दाचा अर्थ ......... हा आहे.
अ) नंतर जन्मलेला ब) आधी जन्मलेला क) भविष्यकाळ ड) चालू वर्तमानकाळ

१४) मी पुस्तक वाचले. या वाक्याचा काळ ओळखा.
अ) साधा वर्तमानकाळ ब) साधा भूतकाळ क) भविष्यकाळ ड) चालू वर्तमानकाळ

१५) 'पंधरवड्याने प्रसिद्ध होणारे' यासाठी खालीलपैकी कोणता पर्याय अचूक ठरेल?
अ) दैनिक ब) मासिक क) पंचांग ड) पाक्षिक

१६) ८ किलो साखरेला ६८ रु. पडतात, तर ६ किलो साखरेला किती रुपये पडतील?
अ) ५५ ब) ५१ क) ४८ ड) ६०

१७) मधुला पाच विषयात सरासरी ७५ गुण पडले उर्वरित दोन विषयात त्याला सरासरी ८० गुण पडले तर त्याला सात विषयात एकूण किती गुण पडले?
अ) ५०५ ब) २३५ क) ५३५ ड) ५१५

१८) एक गाय १८०० रुपयास खरेदी केला व तिला ८ टक्के शेकडा नफा घेऊन विकले तर गायीची विक्री किंमत काय?
अ) १९२० ब) १९३६ क) १९५० ड) १९४४

१९) एका आयताच्या लांबी व रुंदी मध्ये २ से. मी. फरक आहे व लांबी व रुंदीची बेरीज ८ से. मी. आहे. तर आयताचे क्षेत्रफळ किती?
अ) २० ब) २२ क) १८ ड) १५

२०) $१० \times १० + १२ + ३ =$
अ) ११५ ब) १३३ क) २५० ड) १०५

२१) ५ से. मी. बाजू असलेल्या चौरसाची परिमिती किती?
अ) २० से. मी. ब) २५ से. मी. क) ३० से. मी. ड) १० से. मी.

२२) एका काटकोन त्रिकोणात काटकोन करणाऱ्या बाजू ३ से. मी. व ४ से. मी आहेत तर त्याच्या कर्णाची लांबी काढा.
अ) ५ से. मी. ब) १० से. मी. क) १५ से. मी. ड) २५ से. मी.

२३) दहा मुलांचे सरासरी वय २० वर्षे आहे, त्यामध्ये त्यांच्या प्रशिक्षकाचे वय मिळवल्यास सरासरी २२ होते तर प्रशिक्षकाचे वय किती?
अ) ३० ब) ३५ क) ४२ ड) ४५

२४) १ कि.मी. म्हणजे किती सेंटिमीटर?
अ) १००० से.मी. ब) १००००० से. मी. क) १०,००,००० से.मी. ड) यापैकी नाही

२५) वडील व मुलगा यांच्या वयांचे गुणोत्तर ५ : ३ आहे, त्यांच्या वयाची बेरीज ८० आहे. तर वडिलांचे वय किती असेल?
अ) ६० ब) ५० क) ४० ड) ३०

२६) $४५ \times १२ = ?$
अ) ५४० ब) ५७ क) ० ड) ३३

२७) एक घोडा ७ मीटर लांबीच्या दोराने एका ठिकाणी बांधला आहे. तो ज्या भागामध्ये चढू शकेल त्या भागाचे क्षेत्रफळ काढा?
अ) १४४ चौ. सी. ब) १५४ चौ. मी. क) १६४ चौ. मी. ड) १७४ चौ. मी.

२८) ५ मैल = किती किलोमीटर
अ) ६ ब) १० क) ८ ड) ५

२९) $(५ + ३) \times (५ - ३) = ?$
अ) १५ ब) १६ क) १८ ड) ४८

३०) दोन शहरामधील अंतर ३०० किमी आहे. १२० किमी प्रति तास वेगाने धावणाऱ्या रेल्वेस हे अंतर कापण्यास किती वेळ लागेल?
अ) दीड तास ब) दोन तास क) अडीच तास ड) तीन तास

३१) एका चौरसाचे क्षेत्रफळ १४४ चौसेमी असल्यास त्या चौरसाची परिमिती किती होईल?
अ) ३२ ब) ३६ क) ४२ ड) ४८

३२) बेरीज करा. ५ तास ५५ मिनिटे + ४ तास + ४४ मिनिटे =
अ) १० तास ३५ मिनिटे ब) १० तास ३९ मिनिटे क) ९ तास ४९ मिनिटे ड) १० तास ३३ मिनिटे

३३) एक घड्याळ दर तासाला १० सेकंद मागे पडते. हे घड्याळ सोमवारी सकाळी १०.०० वाजता बरोबर लावले, तर गुरुवारी संध्याकाळी १० वाजता घड्याळ्यात किती वाजतील?
अ) ९ वाजून ४६ मिनिटे ब) ९ वाजून ५० मिनिटे क) १० वाजून १० मिनिटे ड) १० वाजून ५० मिनिटे

३४) एकतीस मुलींच्या रांगेत लिनाचा डावीकडून पंधरावा क्रमांक आहे तर उजवीकडून मोजल्यास तिचा क्रमांक कितवा येईल?
अ) १५ ब) १६ क) १७ ड) १८

३५) राजू हा तुषारपेक्षा मोठा आहे पण प्रशांतपेक्षा लहान आहे. विनय हा विरापेक्षा मोठा असून तुषारपेक्षा लहान आहे. तर वयाने सर्वात मोठा कोण ?
अ) विनय ब) प्रशांत क) राजू ड) विरा

३६) दहा दिवसापूर्वी शुक्रवार होता. उद्यानंतर तिसऱ्या दिवशी कोणता वार असेल ?
अ) बुधवार ब) शुक्रवार क) सोमवार ड) गुरुवार

३७) एका संख्येतील अंकांची बेरीज २४ आहे. म्हणून तिला खालीलपैकी ...... ने नक्की भाग जातो.
अ) ६ ब) ४ क) ८ ड) ३

३८) एका त्रिकोणातील कोनांचे प्रमाण २ : ३ : ४ असेल तर सर्वात मोठ्या कोनाचे माप किती?
अ) ४० ब) ६० क) ८० ड) १००

३९) x ही एक सम संख्या असेल खाली तर खालीलपैकी विषम संख्या कोणती?
अ) $३x + ३$ ब) $३x$ क) $३x - २$ ड) $३x + ४$

४०) दोन संख्यांचा गुणाकार ३० आहे. त्यांच्या वर्गाची बेरीज ६१ आहे तर त्या दोन संख्यांची बेरीज किती येईल?
अ) ११ ब) २१ क) ३१ ड) १७

४१) चंद्रपूर जिल्ह्यांमध्ये एकूण तालुक्यांची संख्या किती?
अ) १५ ब) १४ क) १२ ड) १३

४२) चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यांची सीमा रेषा ..... ही नदी ठरविते.
अ) पैनगंगा ब) वैनगंगा क) वर्धा ड) ईरइ

४३) चंद्रपूर जिल्ह्याचे विभाजन होऊन हा नवीन जिल्हा निर्माण झाला?
अ) गडचिरोली ब) वर्धा क) यवतमाळ ड) गोंदीया

४४) महाराष्ट्रात ....... प्रशासकीय /महसूल विभाग आहेत.
अ) चार ब) पाच क) सहा ड) सांत

४५) महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना कोठे स्थापन झाला?
अ) प्रवरानगर ब) वारणानगर क) सांगली ड) कोल्हापूर

४६) ताडोबा राष्ट्रीय उद्यान महाराष्ट्राच्या ........या जिल्ह्यात आहे.
अ) भंडारा ब) चंद्रपूर क) गडचिरोली ड) वर्धा

४७) महाराष्ट्राचे सध्याचे उपमुख्यमंत्री......आहेत.
अ) आर. आर. पाटील ब) छगन भुजबळ क) अजित पवार ड) जयंत पाटील

४८) चंद्रपूर जिल्ह्यात स्त्री व पुरुष प्रमाण प्रति हज़ार पुरुषांमागे .........स्त्रियां इतके आहे.
अ) ८४९ ब) ९६१ क) ८८० ड) ९४८

४९) जिल्ह्यातील महसूल प्रशासनाचे प्रमुख ....... हे असतात.
अ) तहसीलदार ब) जिल्हाधिकारी क) आयुक्त ड) उपजिल्हाधिकारी

५०) ग्रामसभेच्या बैठका वर्षातून किमान ............. वेळा घेतल्या जातात.
अ) ३ ब) ४ क) ५ ड) ६

५१) भारताच्या घटनासमितीचे प्रमुख ....... हे होते.
अ) जवाहरलाल नेहरू ब) डॉ. बाबासाहेब आंबेडकर
क) सरदार पटेल ड) डॉ. राजेंन्द्र प्रसाद

५२) भारतातील सर्वात उंच पर्वत शिखर ....... हे आहे.
अ) कांचनगंगा ब) एव्हरेस्ट क) महाबळेश्वर ड) कळसूबाई

५३) सुभाषचंद्रबोस यांनी ......... ची स्थापना केली.
अ) हिंदु महासभा ब) समाजवादी पार्टी क) आझाद हिंद फौज ड) कॉंग्रेस

५४) वंद मातरम् हे राष्ट्रगीत ...........यांनी लिहिले.
अ) रविंद्रनाथ टागोर ब) बंकिमचंद्र चटर्जी क) वि. वा. शिरवाडकर ड) यापैकी कोणीही नाही

५५) तलाठ्याच्या कार्यालयास ............ असे म्हणतात.
अ) चावडी ब) पार क) दफ्तर ड) सजा

५६) ............ हा जिल्हा प्रशासनाचा केंद्रबिंदू मानला जातो.
अ) मुख्य कार्यकारी अधिकारी ब) जिल्हा परिषद अध्यक्ष
क) जिल्हाधिकारी ड) जिल्हा माहिती अधिकारी

५७) दक्षिण आशियाई क्षेत्रीय सहकार्य संघटना म्हणजे ...... होय.
अ) SAARK ब) SAARC क) SARCC ड) SARRC

५८) १४ नोव्हेंबर ........ दिन म्हणून साजरा केला जातो.
अ) प्रजासत्ताक ब) महिला क) बाल ड) युवक

५९) १ ऑगस्ट हा ...... दिन म्हणून साजरा करण्यात येतो.
अ) ग्रामविकास ब) महसूल क) आरोग्य ड) यापैकी कोणतेही नाही

६०) जिल्हा परिषदेचा प्रमुख प्रशासन अधिकारी ......... हा असतो.
अ) जिल्हाधिकारी ब) मुख्य कार्यकारी अधिकारी
क) जिल्हापरिषद अध्यक्ष ड) विभागीय आयुक्त

६१) उत्क्रांती वादाचा सिद्धांत कोणी मांडला?
अ) मेंडेल ब) डार्विन क) ऑईनस्टाईन ड) रॉबर्टकॉक

६२) खालीलपैकी कोणता रोग संसर्गजन्य नाही?
अ) कर्करोग ब) क्षयरोग क) ईनफ्ल्युएंझा ड) यापैकी कोणतेही नाही

६३) हळुहळू होत जाणारे बदल.
अ) क्रांती ब) सुधारणा क) प्रतिक्रांती ड) उत्क्रांती

६४) खालीलपैकी ......... हा पक्षी वर्गातील प्राणी 'सस्तन' आहे.
अ) कबुतर ब) शहामृग क) पेंग्विन ड) वटवाघूळ

६५) 'WHO' हि संघटना कशाशी संबंधित आहे?
अ) संपत्ती ब) आरोग्य क) शिक्षण ड) रोजगार

६६) विद्युत बल्बमध्ये कोणता वायु असतो?
अ) हायड्रोजन ब) नायट्रोजन क) ऑक्सिजन ड) यापैकी कोणताही नाही

६७) Fill in the blanks with the correct alternative.
I have been living here ....... 1972.
A) from B) since C) for D) during

६८) You shall refrain ...... telling lies.
A) for B) From C) with D) to

६९) He took advantage ......... my ignorance.
A) of B) by C) at D) over

७०) I cannot ....... your invitation.
A) except B) accept C) present D) none of these

७१) There is a bridge ......the river.
A) on B) over C) to D) above

७२) The correct meaning of polite is.....
A) rude B) angry C) courteous D) none of these

७३) That is ......... interesting book.
A) the B) a C) an D) their

७४) He came ........home late night.
A) to B) at C) in D) none of these

७५) Antonym for abundance is
A) scarcity B) penalty C) more D) none of these

७६) Antonym for Ferocious is
A) dangerous B) gentle C) deceptive D) wicked

७७) The correct meaning of "Bread & Butter" is
A) Bag & Baggage B) livelihood C) Breakfast D) Dinner

७८) A person who has no money to pay off his debts is
A) pauper B) beggar C) insolvent D) debtor

७९) One who can speak many languages.
A) A linguist B) A multilingual C) A polyglot D) A phonetician

८०) To root out an evil means
A) eradicate B) dissolve C) abolish D) void

८१) The correct synonym of "accessory" is
A) moving B) real C) additional D) hard

८२) The plural of word "Goose" is
A) Goose B) Gooses C) Geese D) Goost

८३) The opposite gender of the word "Nephew" is
A) Nephews B) Nephewes C) Niece D) Nice

८४) The simple past tense of word "To write" is
A) Written B) Wrote C) Write D) None of these

८५) The earth ....... round the sun.
A) Is revolving B) Revolved C) Revolve D) Revolves

गटातील असंबंध शब्द/वस्तू ओळखा.

८६) चंद्रपूर, बल्लारपूर, चिमूर व मूल
अ) चंद्रपूर ब) बल्लारपूर क) चिमूर ड) मूल

८७) झाड, कुत्रा, गाय, टेबल
अ) झाड ब) कुत्रा क) गाय ड) टेबल

८८) रेडियम, थोरीयम, सोडियम, पोलोनियम
अ) रेडियम    ब) थोरीयम    क) सोडियम    ड) पोलोनियम

८९) एका त्रिकोणाचे क्षेत्रफळ ३० से. मी. असून पाया ६ से. मी. असल्यास त्रिकोणाची उंची किती?
अ) ८ से. मी.    ब) १० से.मी.    क) १२ से.मी    ड) १५ से. मी.

९०) अलिगढ मुस्लिम विद्यापीठाची स्थापना ........ यांनी केली.
अ) सर सिकंदर ह्यात खान    ब) सर सय्यद अहमद खान    क) जिना    ड) लियाकत अली खान

९१) प्रोग्राम व डाटा तात्पुरता संगणकात साठवून ठेवण्यासाठी ........चा उपयोग होतो.
अ) RAM    ब) ROM    क) CD    ड) यापैकी नाही

९२) भारतीय साहित्य क्षेत्रातील सर्वोच्च पुरस्कार हा आहे.
अ) साहित्य अकादमी    ब) कालिदास सन्मान    क) ज्ञानपीठ    ड) अर्जुन

९३) महाराष्ट्रात पंचायतराज व्यवस्था ........ पासून अमलात आणली
अ) १ मे १९६०    ब) १ मे १९६१    क) १ मे १९६२    ड) १ मे १९६४

९४) एक रुपयाच्या चलनी नोटा चलनात आणण्याचे अधिकार कोणास आहे?
अ) नियोजन आयोग    ब) आर. बी. आय    क) एस. बी. आय    ड) केंद्रीय अर्थ खाते

९५) पाण्याची घनता .......ला सर्वात जास्त असते.
अ) ४ अंश से.    ब) २५ अंश से.    क) ० अंश से.    ड) ७३ अंश से.

९६) ध्वनीतरंगाचे प्रसारण ........ मधून होत नाही.
अ) स्थायू    ब) द्रव    क) वायू    ड) निर्वात जागा

९७) ८ मार्च हा ....... म्हणून पाडला जातो.
अ) आंतरराष्ट्रीय महिला दिन    ब) जागतिक एडस् दिन
क) मानवी हक्कदिन    ड) जागतिक कामगार दिन

९८) बल मोजण्याचे एकक ....... हे आहे.
अ) पास्कल    ब) अर्ग    क) कॅलरी    ड) न्यूटन

९९) भारताचे राष्ट्रपती........ हे आहे.
अ) प्रतिभाताई पाटील    ब) मनमोहन सिंग    क) मो. अंसारी    ड) प्रणव मुखर्जी

१००) 'साऱ्यांनी मनसोक्त हसावे' या वाक्यातील प्रयोग ओळखा.
अ) सकर्मक कर्तरी    ब) अकर्मक कर्तरी    क) भावे    ड) कर्मणी

## उत्तरे – जिल्हा निवड समिती, चंद्रपूर, तलाठी पदासाठी लेखी परीक्षा (१ सप्टेंबर, २०१३)

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १–अ | २–ब | ३–अ | ४–ब | ५–क | ६–ब | ७–क | ८–ड | ९–क | १०–ड |
| ११–अ | १२–क | १३–अ | १४–ब | १५–ड | १६–ब | १७–क | १८–ड | १९–ड | २०–अ |
| २१–अ | २२–अ | २३–क | २४–ब | २५–ब | २६–अ | २७–ब | २८–ब | २९–ब | ३०–क |
| ३१–ड | ३२–ब | ३३–अ | ३४–क | ३५–ब | ३६–ब | ३७–ड | ३८–क | ३९–अ | ४०–अ |
| ४१–अ | ४२–ब | ४३–ड | ४४–ब | ४५–अ | ४६–ब | ४७–क | ४८–ब | ४९–ब | ५०–ड |
| ५१–ड | ५२–अ | ५३–क | ५४–ब | ५५–ड | ५६–क | ५७–ब | ५८–क | ५९–ब | ६०–ब |
| ६१–ब | ६२–अ | ६३–ड | ६४–ड | ६५–ब | ६६–ड | ६७–B | ६८–B | ६९–A | ७०–B |
| ७१–A | ७२–C | ७३–C | ७४–D | ७५–A | ७६–B | ७७–B | ७८–C | ७९–A | ८०–A |
| ८१–C | ८२–C | ८३–C | ८४–B | ८५–D | ८६–ड | ८७–ड | ८८–ड | ८९–ब | ९०–ब |
| ९१–क | ९२–क | ९३–क | ९४–ब | ९५–अ | ९६–ड | ९७–अ | ९८–ड | ९९–ड | १००–क |